पुणे महानगरपालिका

*** शहर सुधारणा समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक – १०**

**शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा शुक्रवार, दि. २७ /८/२०१० रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता समितीच्या सभागृहात भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**विषय क्र. ५९**

**मा. भिमराव खरात व मा. गणेश बिडकर यांचे दि. १२/८/२०१० चे पत्र.**

वॉर्ड क्र. ७ मध्ये लोहगांव स.नं.१४६ व १४७ या जागेवर उद्यान, पाण्याची टाकी व स्मशानभूमी, प्ले ग्राऊंडचे नविन होणाऱ्या डी.पी.मध्ये आरक्षण टाकण्यात यावे त्यामुळे त्या भागातील नागरिकांची गैरसोय दूर होण्यास मदत होईल.

**विषय क्र. ६०**

**मा. भिमराव खरात व मा. गणेश बिडकर यांचे दि. १२/८/२०१० चे पत्र.**

वॉर्ड क्र. ७ मध्ये खुळेवाडी स.नं.१४६ या जागेवर झोपडपट्टी अस्तित्वात असून अनेक वर्षापासून नागरिक रहात आहेत. सदर जागेवर सध्या उद्यानाचे आरक्षण असून सदरचे आरक्षण रद्द करून त्या ठिकाणी ग.व.नि.घोषित झोपडपट्टीचे आरक्षण दर्शवून घोषित करण्यात यावी.

**विषय क्र. ६१**

**मा.सौ.मेघा बाबर व मा.सौ.दिपाली ओसवाल यांचे दि. २१/८/२०१० चे पत्र.**

संत ज्ञानेश्वर नगर स.नं.१४४ कोंढवा खुर्द येथील नागरिकांना जाण्या येण्यासाठी रस्ता उपलब्ध नसल्याने येथील नागरिकांना स.नं.४४ पूर्व पासून बिबवेवाडी स.नं.६५६ पश्चिम असा ४० फुटी रस्ता कलम २०५ अन्वये आखण्यात यावा.

नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.